# महाराष्ट्र शिकाऊ उमेदवारी प्रोत्साहन योजना - (MAPS)

**योजना मंजुरीसाठी लागणारा कालावधी : ६० दिवस**

1. शासकीय, निमशासकीय आणि खाजगी आस्थापनांमध्ये शिकाऊ उमेदवारी प्रशिक्षण योजनेअंतर्गत शिकाऊ उमेदवारांची भरती वाढवून प्रोत्साहीत करण्यासाठी "महाराष्ट्र शिकाऊ उमेदवारी प्रोत्साहन योजनेस (Maharashtra Apprenticeship Promotion Scheme-MAPS)" कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता विभाग, शासन निर्णय क्र. आयटीआय-2020/प्र.क्र. 127/व्यशि-3, दिनांक 03/06/2021 अन्वये मान्यता देण्यात आलेली आहे.
2. महाराष्ट्र शिकाऊ उमेदवारी प्रोत्साहन योजनेअंतर्गत प्रशिक्षण घेणाऱ्या शिकाऊ उमेदवारांना देय विद्यावेतनाच्या 75 टक्के किंवा जास्तीत जास्त रुपये 5,000/- यापैकी कमी असलेले विद्यावेतन शिकाऊ उमेदवारांना शासनातर्फे अनुज्ञेय राहील. तथापि, राष्ट्रीय शिकाऊ उमेदवारी प्रोत्साहन योजनेअंतर्गत आस्थापनांना अनुज्ञेय ठरणारी विद्यावेतन प्रतिपूर्ती आणि महाराष्ट्र शिकाऊ उमेदवारी प्रोत्साहन योजनेअंतर्गत शिकाऊ उमेदवारांना अनुज्ञेय ठरणारा विद्यावेतनाचा आर्थिक लाभ एकत्रितपणे देय एकूण विद्यावेतनाच्या 75% पेक्षा अधिक अनुज्ञेय ठरणार नाही.
3. मूलभूत प्रशिक्षण देणाऱ्या संस्थेस (Basic Training Provider) रु.20/- प्रतितास या दराने (केंद्र शासनाकडून मिळणारी प्रतिपूर्ती रु.15/- प्रतितास वजा करुन) जास्तीत जास्त 500 तासांकरिता रु.2,500/- एवढी प्रशिक्षण खर्च प्रतिपूर्ती मूलभूत प्रशिक्षण देणाऱ्या संस्थेस प्रति प्रशिक्षणार्थी अनुज्ञेय राहील.
4. तसेच ज्या मूलभूत प्रशिक्षण देणाऱ्या संस्थेस (Basic Training Provider) केंद्र शासनाकडून प्रशिक्षण खर्च प्रतिपूर्ती मिळणार नाही, अशा संस्थांना रु.20/- प्रतितास या दराने जास्तीत जास्त 500 तासांकरिता रु. 10,000/- एवढी प्रशिक्षण खर्च रक्कम प्रतिपूर्ती मूलभूत प्रशिक्षण देणाऱ्या संस्थेस प्रति प्रशिक्षणार्थी अनुज्ञेय राहील.

## योजनेच्या पात्रतेचे निकष

1. ITI उत्तीर्ण प्रशिक्षणार्थी
2. केंद्रीय शिकाऊ उमेदवारी संकेत स्थळावर (नोंदणी कृत) महाराष्ट्र राज्याचे सर्व उमेदवार.

## योजनेसाठी आवश्यक कागदपत्रे

विद्या वेतनासाठी प्रथम अर्ज करताना :-

1. शिकाऊ उमेदवारी नोंदणीकृत कराराची प्रत.
2. महाराष्ट्र राज्याचा उमेदवार असल्याबाबतचेअधिवास/जन्मप्रमाणपत्र
3. उमेदवाराच्या आस्थापनेकडून प्राप्त विद्यावेतन, बँक स्टेटमेंट किंवा पासबकची प्रत

## योजना मंजूर करणारे सक्षम प्राधिकारी

स्तर-1: संबंधित आस्थापना

स्तर-2: संबंधित सहसंचालक तथा प्रशिक्षण-नि-प्रशिक्षणार्थी सह सल्लागार, प्रादेशिक कार्यालय

## योजनेसंदर्भात तक्रार निवारण करणारे अधिकारी

स्तर-1: सहाय्यक प्रशिक्षणार्थी सल्लागार, मुलभूत प्रशिक्षण तथा अनुषंगिक सूचना केंद्र संबंधित जिल्हा अधिकारी

स्तर-2: जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी तथा जिल्हा उप-प्रशिक्षणार्थी सल्लागार

स्तर-3: सहसंचालक तथा प्रशिक्षण-नि-प्रशिक्षणार्थी सह सल्लागार

स्तर-4: संचालक तथा राज्य प्रशिक्षणार्थी सल्लागार

# शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमधील शिल्प कारागिर योजने अंतर्गत असलेल्या अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेतलेल्या सर्व प्रर्वगातील प्रशिक्षणर्थ्यांना सन 2023-24 या शैक्षणिक वर्षापासून दरमहा 500/- इतक्या दराने विद्यावेतन

**योजना मंजुरीसाठी लागणारा कालावधी : ४५ दिवस**

शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमधील शिल्प कारागिर योजने अंतर्गत असलेल्या अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेतलेल्या सर्व प्रर्वगातील प्रशिक्षणर्थ्यांना सन 2023-24 या शैक्षणिक वर्षापासून दरमहा 500/- इतक्या दराने विद्यावेतन

## योजनेच्या पात्रतेचे निकष

1. प्रशिक्षणार्थी महाराष्ट्रातील आधिवासी असावा.
2. वार्षिक उत्पन्न ८ लाख रुपयांपेक्षा जास्त नसावे. महाराष्ट्र सरकारने (GoM) नॉन-क्रीमी लेयर निकषांसाठी भविष्यात केलेल्या सुधारणा लागू होतील किंवा उत्पन्नाचा दाखला
3. सदर योजनेचा लाभ हा कुटुंबातील केवळ  दोन अपत्यांपर्यंत मर्यादीत राहील.
4. हा लाभ दोन हप्त्यांमध्ये दिला जाईल.
5. सरासरी ८०% उपस्थिती राखणे अनिवार्य आहे.
6. २ वर्षांच्या कालावधीच्या अभ्यासक्रमामध्ये नोंदणी केलेल्या प्रशिक्षणार्थींसाठी, पहिले  वर्ष उत्तीर्ण होणे आवश्यक आहे.
7. २.५ लाख रुपयांपेक्षा कमी वार्षिक उत्पन्न असलेले अनुसूचित जातीचे प्रशिक्षणार्थी देखील पोस्ट मॅट्रिक शिष्यवृत्तीसाठी पात्र आहेत.
8. अखिल भारतीय ट्रेड टेस्ट (AITT) साठी निलंबित केलेले किंवा अपात्र आढळलेले प्रशिक्षणार्थी पात्र राहणार नाहीत.
9. GITI सोडलेले प्रशिक्षणार्थी त्यांच्या प्रस्थान तारखेपासून पात्र नाहीत.
10. राष्ट्रीयकृत बँकेत आधार-सलंग्न केलेले बचत बँक खाते असणे अनिवार्य आहे.
11. MAHA-DBT पोर्टलवर प्रशिक्षणार्थी नोंदणी अनिवार्य आहे.
12. शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमधील प्रशिक्षणार्थी या योजनेसाठी पात्र आहेत.

## योजनेसाठी आवश्यक कागदपत्रे

1. सक्षम प्राधिकाऱ्याने विहित कालावधीसाठी दिलेला उत्पन्नाचा दाखला / नॉन-क्रीमी    लेयर प्रमाणपत्र
2. गुणपत्रिका (अभ्यासक्रमाच्या निकषांनुसार).
3. आधार कार्ड.
4. अधिवास प्रमाणपत्र.
5. जात प्रमाणपत्र/इ.डब्ल्यू.एस. /एस.इ.बी.सी.

## योजना मंजूर करणारे सक्षम प्राधिकारी

1. प्राचार्य  संबंधित औद्योगिक प्रशिक्षण संस्था - लाभ मंजुरी
2. संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय  मुंबई, महाराष्ट्र राज्य.- देयक अदा करणेबाबतची कार्यवाही

## योजनेसंदर्भात तक्रार निवारण करणारे अधिकारी

1. सहसंचालक, प्रादेशिक कार्यालय, मुंबई, पुणे, नाशिक, छत्रपती संभाजी नगर, अमरावती, नागपूर
2. संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय  मुंबई, महाराष्ट्र राज्य.

# सामाजिक व शैक्षणिक दृष्टया मागास व खुल्या प्रवर्गातील (आर्थिक दृष्टया दुर्बल घटक) विद्यार्थ्यांकरिता " व्यवसाय प्रशिक्षण शुल्क प्रतिपूर्ती योजना"

**योजना मंजुरीसाठी लागणारा कालावधी : ४५ दिवस**

शासकीय औद्योगिक संस्थामधील पीपीपी योजनेंतर्गंत उपलब्ध जागांवर तसेच खाजगी औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमध्ये केंद्रीय ऑनलाईन पध्दतीने प्रवेश घेणाऱ्या सामाजिक व शैक्षणिक दृष्टया मागास व खुल्या प्रवर्गातील (आर्थिक दृष्टया दुर्बल घटक) विद्यार्थ्यांकरिता " व्यवसाय प्रशिक्षण शुल्क प्रतिपूर्ती योजना"

## योजनेच्या पात्रतेचे निकष

1. शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था पीपीपी योजनेतंर्गत किंवा खाजगी औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत केंद्रीय ऑनलाइन प्रवेशप्रक्रियेद्वारे (CAP Round,Councelling round सहीत) प्रवेश असावा.
2. खाजगी औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील व्यवस्थापन कोटयातील जागांवर प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांना ही योजना लागू नाही.
3. सामाजिक व शैक्षणिक दृष्टया मागास व खुल्या प्रवर्गातील (आर्थिक दृष्टया दुर्बल घटक) विद्यार्थी असावा.
4. एकूण कौटुंबिक उत्पन्न विचारात घेतले जाईल (वडील + आईचे उत्पन्न)

1. कुटुंबाचे उत्पन्न २,५०,००० पेक्षा जास्त किंवा ८,००,००० लाखांपेक्षा कमी असल्यास शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील अभ्यासक्रमांसाठी निश्चित केलेले प्रशिक्षण शुल्क वजा जाता उर्वरीत प्रशिक्षण शुल्काच्या 80% इतक्या रक्कमेची प्रतिपूती सामाजिक व शैक्षणिक दृष्टया मागास व खुला (आर्थिक दृष्टया दुर्बल घटक) प्रवर्गातील विद्यार्थ्यांना अनुज्ञेय राहील.

2. कुटुंबाचे उत्पन्न २,५०,००० पेक्षा कमी किंवा समान असल्यास शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील अभ्यासक्रमांसाठी निश्चित केलेले प्रशिक्षण शुल्क वजा जाता उर्वरीत प्रशिक्षण शुल्काच्या 100% इतक्या रक्कमेची प्रतिपूती सामाजिक व शैक्षणिक दृष्टया मागास व खुला (आर्थिक दृष्टया दुर्बल घटक) प्रवर्गातील विद्यार्थ्यांना अनुज्ञेय राहील.

5. अनाथ विद्यार्थ्यांना शिफारस पत्र आवश्यक आहे.
6. विद्यार्थ्यांने यापूर्वी शासकीय किंवा खाजगी औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमध्ये कोणत्याही अभ्यासक्रमासाठी लाभ घेतलेला नसावा.
7. विद्यार्थ्यांने राज्य / केंद्र सरकार / विभाग / स्थानिक संस्था / कंपनी किंवा महामंडळाद्वारे प्रायोजित प्रशिक्षण कार्यक्रमासाठी कोणताही लाभ घेतलेला नसावा.
8. विद्यार्थी महाराष्ट्र राज्याचा अधिवासी असणे आवश्यक.
9. डीजीटी, नवी दिल्ली किंवा एमएससीव्हीटी मान्यताप्राप्त अभ्यासक्रमांसाठी प्रवेश घेणे बंधनकारक राहील.
10. सदर योजनेचा लाभ हा कुटुंबातील केवळ पहिल्या दोन अपत्या पर्यंत मर्यादीत राहील तिसऱ्या व त्यापुढील कुटुंबातील अपत्याला सदर योजनेचा लाभ अनुज्ञेय असणार नाही.
11. प्रशिक्षण वर्गातील ८०% उपस्थितीचे निकष अनिवार्य आहे.
12. विद्यार्थ्याला प्रत्येक सत्र / वार्षिक परीक्षेला उपस्थित राहणे आवश्यक आहे. जर वैद्यकीय आपत्कालीन परिस्थिती असेल तर संस्थेने शिफारस केल्यानंतर प्रादेशिक सहसंचालकांनी प्रमाणित करावे किंवा शिफारस करावी.
13. गैरवर्तनामुळे शैक्षणिक प्रगती असमाधानकारक - शैक्षणिक वर्षात अनुत्तीर्ण होणे, उपस्थितीचे निकष पूर्ण न करणे आढळल्यास विद्यार्थी शिष्यवृत्तीसाठी पात्र राहणार नाही.
14. विद्यार्थ्यांचे राष्ट्रीयकृत बँकेत आधार संलग्न खाते आवश्यक राहील.

**सामाजिक व शैक्षणिक दृष्टया मागास व खुल्या प्रवंगातील (आर्थिक दृष्टया दुर्बल घटक) विद्यार्थ्यांकरिता " व्यवसाय प्रशिक्षण शुल्क प्रतिपूर्ती योजना"**

## योजनेसाठी आवश्यक कागदपत्रे

**प्रथम अर्ज करताना :-**

1. विद्यार्थ्यांनी महाडीबीटी पोर्टलवर आपल्या आधार क्रमांक नोंदणीकरुन ऑनलाईन अर्ज भरणे
2. महाराष्ट्र राज्यातील आधीवास प्रमाणपत्र ( Domicile Certificate)
3. शैक्षणिक वर्षाच्या लगतपूर्वीच्या विद्यार्थ्यांच्या पालकांचे ( आई व वडील यांचे एकत्रित) वार्षिक उत्पन्नांचे प्रमाणपत्र सक्षम प्राधिकाऱ्याकडून सादर करणे बंधनकारक.
4. माध्यमिक /उच्च माध्यमिक, गुण पत्रिका / प्रमाणपत्र ( दहावी / बारावी ) /
5. रेशन कार्ड
6. Cap Round  Admission confirmation Slip प्रमाणपत्र
7. सक्षम प्राधिकाऱ्याने विहित कालावधीसाठी दिलेले SEBC/EWS प्रमाणपत्र

**नुतनीकरणांच्या अर्जासाठी :-**

1. पहिल्या वर्षात औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत उत्तीर्ण झालेली गुण पत्रिका.

## योजना मंजूर करणारे सक्षम प्राधिकारी

1. सहसंचालक, प्रादेशिक कार्यालय, मुंबई, पुणे, नाशिक, छत्रपती संभाजी नगर, अमरावती, नागपूर - लाभ मंजुरी
2. संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय  मुंबई, महाराष्ट्र राज्य.- देयक अदा करणेबाबतची कार्यवाही

## योजनेसंदर्भात तक्रार निवारण करणारे अधिकारी

1. संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, मुंबई, महाराष्ट्र राज्य.